# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१५/०७/२०१६.

**१) शेतातुन केबल वायरची चोरी. :—**

दिनांक १३+१४/०७/०१६ रोजी रात्र दरम्यान फिर्यादी वासुदेव बुड्डा राहांगडाले वय ६३ वर्ष, रा. पळसपाणी यांच्या शेतावर लावलेल्या विद्युत बोरवेलचे मिटर लावलेल्या पेटीची तोडफोड करून विद्युत कनेक्शन करीता लावलेला ८०० फुट केबल वायर कि. ३०००/—रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. असे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अवैधरित्या रेतीची चोरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १४/०७/२०१६ चे ०८.३० वा. दरम्यान आरोपी हा त्याचा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ डी ९६२० मध्ये बिनापास परवाणा अवैधरित्या ९ ब्रास रेती कि. १५००/—रू. ची चोरून नेतांना दाभा टि पॉईट येथे मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि सपोनि. वर्मा पो.स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) इलेक्ट्रॉनिक डिपी मधील ट्रान्सफार्मर ऑईलची चोरी. :—**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी १८.०० ते दि. १४/०७/०१६ रोजी १०.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने भिलेवाडा शिवार येथुन म.रा.वि.वि. कंपनीच्या इलेक्ट्रॉनिक डिपी मधील १४० लिटर ट्रान्सफार्मर ऑईल कि. ७०००/—रू. चा चोरून नेला. असे फिर्यादी विजय वसंतराव निमजे वय ३६ वर्ष, सहायक अभियंता म.रा.वि.वि. कंपनी कार्यालय कारधा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. खैरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १४/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व इतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात